# INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED & MULTILINGUAL STUDIES

UGC Approved Research Journal (Sr. 47674)

Volume IV
Issue XII

ISSN : 2394-207X (Print)
IMPACT FACTOR : 4.205

December 2017


A Galaxy of Scholarly Written Research Papers/Articles

IJMMS

Cosmos


**Chief Editor**
Dr. V. H. Mane

**Executive Editor**
Prof. M. P. Shaikh



www.ijmms.in | Email : ijmms14@gmail.com

| | | | |
|---|---|---|---|
| ३६ | कृषी, आपत्ती व्यवस्थापन व औघोगिकरणाचा पाया भक्कम करणारा नेता मा. शरदचंद्र पवार | डॉ. रमेश एस. देसाई | १५४-१५७ |
| ३७ | शरद पवारांनी कृषी क्षेत्रासंबंधी केलेले प्रयोग | डॉ. विलास पाटील | १५८-१६१ |
| ३८ | 'अॅड-राम कांडगे लिखित' लोकनेते शरदरावजी पवार या ग्रंथाचे एक अवलोकन आणि आकलन | संतोष पद्माकर पवार | १६२-१६४ |
| ३९ | राजकीय क्षेत्रातील शरद पवारांचे योगदान | प्रा. सतीश उढाण | १६५-१६७ |
| ४० | आदरणीय शरदचंद्र पवारांचे सहकारातील योगदान | प्रा. शरदकुमार उत्तम शेटे | १६८-१७२ |
| ४१ | प्रभावी व अनुभवी नेतृत्व: शरद पवार | प्रा. ओंकार नरेंद्र केने | १७३-१७५ |
| ४२ | महिला सबलीकरणामध्ये शरद पवार यांचे योगदान | प्रा. ज्ञानेश्वर खोडवे | १७६-१७९ |
| ४३ | शरदचंद्र पवार यांचे कृषिक्षेत्रातील योगदान | प्रा. लोहगावकर जयश्री | १८०-१८४ |
| ४४ | आधुनिक भारताच्या विकासात शरदपवार यांचे योगदान: विशेष संदर्भ महाराष्ट्राच्या राजकारणाची अभिजन चौकट | राजकुमार सुरवसे | १८५-१८६ |
| ४५ | सकलजनवादी नेतृत्व शरद पवार | वैशाली प्रकाश पवार | १८७-१९१ |
| ४६ | पुलोद सरकार आणि शरद पवार यांची भूमिका | प्रा. सुपेकर वैशाली प्रशांत | १९२-१९४ |
| ४७ | मा. शरद पवार: व्यक्तिमत्त्व वैशिष्टये आणि नेतृत्व शैली | प्रा. सुनंदा हेळकर | १९५-१९७ |
| ४८ | शरद पवार यांची सामाजिक न्यायवादी भूमिका - विद्यापीठ नामांतर संदर्भात | डॉ. निशा सिताराम मोरे | १९८-२०२ |
| ४९ | कृतीशील व्यक्तिमत्व:शरदराव पवार साहेब | चंद्रकांत पांडूरंग सरगर | २०३-२०४ |
| ५० | बहुआयामी लोकनेता: शरद पवार | डॉ. मीना ठाकूर | २०५-२०६ |
| ५१ | शरद पवारांचे महिला सक्षमीकरणात योगदान | प्रा. राजकुमार बबन रिकामे | २०७-२१० |
| ५२ | महिला सक्षमीकरणास शरद पवारांचे योगदान | प्रा. माधुरी सावंत | २११-२१२ |
| ५३ | शरदचंद्र पवार यांचे महिला सबलीकरण धोरण | प्रा. भाऊसाहेब खंडु सांगळे | २१३-२१४ |

# प्रभावी व अनुभवी नेतृत्व : शरद पवार

**प्रा. ओंकार नरेंद्र केने**
**सहाय्यक प्राध्यापक,**
**राज्यशास्त्र विभाग, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,पुणे.**

*गोषवारा : शरद पवार हे वयाच्या ७७ व्या वर्षात पदार्पण करीत असलेले राजकीय नेतृत्व आहे. देशाच्या आणि राज्याच्या राजकारणात त्यांनी अग्रेसर भूमिका बजावलेली आहे. पवारहे देशाच्या व राज्याच्या विकासासाठी पक्षीय राजकारणाच्या पलिकडचा विचार करतात. देशाच्या हिताच्या दृष्टीने जे काही करता येईल ते करण्याचा प्रयत्न पवार करत असतात.त्यामुळे त्यांच्याकडे सर्व पक्षीय नेते त्यांना मानतात. त्यांच्या या नेतृत्वशैलीचा व कार्यकुशलतेचा प्रभाव जनसामान्याच्या मनावर देखील पडतो. अशा या नेतृत्वाचा अभ्यास प्रस्तुत संशोधन लेखात दुय्यम साधनांच्या आधारे करण्याचा प्रयत्न केलाआहे. शरज पवार हे एक बहुआयामी असं राजकीय नेतृत्व असल्यानेत्यांच्या नेतृत्वाला मान्यता आहे. त्यांच्याकडे असलेला दीर्घ राजकीय अनुभव वनेतृत्वाची कामगिरी याची मांडणी या लेखात करण्याचा प्रयत्न केला आहे.*

**उद्दिष्टे :**

१) भारताच्या आणि महाराष्ट्राच्या राजकारणात पवार नावाचा प्रभाव पाहणे.
२) अनुभव संपन्न राजकारण्यांच्या पंक्तीत शरद पवार यांचे स्थान पाहणे.
३) शरदपवार यांच्या राजकीय कार्यकालातील वादाची पार्श्वभूमी अभ्यासणे.
४) २०१४ च्या सार्वत्रीक निवडणुकांनंतरची शरद पवारांची राजकीय भूमिका अभ्यासणे.

**प्रस्तावना :** भारताच्या राजकारणात चाणक्याप्रमाणे शरद पवार हे आपली भूमिका बजावणारे आहेत.सत्तेच्यापटलावर नेहमी अग्रस्थानी राहिल्याचे बघायला मिळते. वयाच्या ७७ व्या वर्षी पवार हे देशाच्या वराज्याच्या राजकारणात सक्रिय आहेत.त्यांच्या विकासवादी दृष्टीमुळे अनेक क्षेत्रात परिवर्तन झाल्याचे दिसते. कला, साहित्य, क्रीडा, संस्कृती व समाजसेवा आणि विज्ञान इत्यादी क्षेत्राविषयी रस बाळगून प्रत्येक क्षेत्रात प्रगती करण्याची किमया ते साधतात. याबरोबरचत्यांचा जनसंपर्क चांगलाअसल्याने लोकांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत.त्यामुळे हितसंबंधाचे राजकारण पवार करतात.असे असले तरीही एक दृष्टा राजकारणी म्हणून पवार यांची कारकीर्द मोठी आहे.त्यांच्या या कारकीर्दीच्या काळात देशाच्या व राज्याच्या हिताचेअनेक चांगले निर्णय घेण्याससरकारला भाग पाडले. त्यामुळे देशाच्या राजकारणातून त्यांना बाजूला करता येत नाही. कारणराष्ट्रीय राजकारणात डाव्यांपासून ते उजव्यांपर्यंत आणि समाजवाद्यांपासून ते काँग्रेसवाल्यांपर्यंतच्या सर्वच नेत्यांनी पवारांबद्दल गौरवोद्गार काढले आहेत. महाराष्ट्राचे राजकारण तर गेल्या चार दशकापासून शरद पवारांच्या भोवती फिरते आहे. यशवंतराव चव्हाणांचे उत्तराधिकारी ते सध्याच्या राजकारणातील सर्व पक्षातील नेत्यांसाठी ते मार्गदर्शक आहेत. त्यांचा हा सामाजिक व राजकीय प्रवास थक्क करुन टाकणारा आहे. पवारांविषयी समाजामध्ये नेहमीच दोन टोकाची भूमिका असणारे लोक दिसतात. एक म्हणजे पवारांवर प्रचंड प्रेम करणारी व दुसरे म्हणजे पवारांचा टोकांचा तिरस्कार करणारी. अशी दोन परस्पर विरोधी टोक असली तरी त्यांच्यात एक समान धागा दिसतो तो म्हणजे पवारांचे निर्णायकी राजकीय नेतृत्व हे होय. पवारांचा हा प्रवास काटेवाडी (बारामती)पासून सुरु जनपथ १० पर्यंतच्या या प्रवासात सामाजिक व राजकीय जीवनातअनेक आरोप पवारांवर झाले.तरअनेक आर्थिक गैरव्यवहारात पवारांचे नाव घेतले जाते. म्हणजेच देशात व राज्यात काहीही घडले की, शरद पवारांचे नाव त्यासोबत जोडले जाते. तर पवारांनी आपल्या राजकीय कारकीर्दीत एकदाही अनुभव पाहिला नाही. म्हणजे राजकीयदृष्ट्या पवार एकदाही निवडणुकीच्या राजकारणात पराभूत झाले नाहीत. त्यामुळे पवारांचे नेतृत्व प्रभावी तर आहेच त्याबरोबर अनुभव संपन्न असल्याने राजकीय वादाचे बळी ते ठरतात. परंतु त्यांच्यावर कोणत्याही प्रकारच्या गैरव्यवहाराचा आरोप नाही. वयोमानानूसार सध्या पवारांचीराजकारणावरचीपकडकाहीशी कमी झाल्याचे काही विश्लेषकांचे मत आहे. असे असले तरीही२०१४ च्या सार्वत्रीक व महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रातील राजकारणात पवार फॅक्टर प्रत्यक्ष नव्हे तर पडद्यामागूनसक्रिय असून २०१९ च्या निवडणुकांमध्ये निर्णायक भूमिका बजावताना दिसेल असे दिसते.

**देशाच्या राजकारणात शरद पवार :** देशाच्या राजकारणात शरद पवार या नावाला कुठल्याही ओळखीची गरज आज देशात किंवा महाराष्ट्रात नाही, देशातील मोजक्या दिग्गज नेत्यांच्या यादीत पवारांचे नाव दूसऱ्या, तिसऱ्या स्थानावर असल्याचे बघायला मिळते.भारताच्या पंतप्रधानपदाचे सक्षम उमेदवारव महाराष्ट्रातील यशवंतराव चव्हाणानंतरचे एकमेव नेतृत्व अशा रुपात शरद पवारांना पहाण्याची सवय महाराष्ट्रतील त्यांच्या विरोधकांना ही आहे. शरद पवारांनी यशवंतराव चव्हाण यांच्याप्रमाणेबेरजेच राजकारण करुन राज्याचे नेतृत्व केले. महाराष्ट्राच्या राजकारणावर आपले वर्चस्व निर्माण केल्यानंतरत्यांनी मराठा समाज संघटीत करुन आपला एक गट तयार केला. शरद पवारांच्या या सर्वसमावेशक राजकारणात अनेक विचारांचे

प्रवाह एकत्र आले. त्यामुळे त्याचे राज्याच्या राजकारणातील स्थान अबाधित राहिले. असे फक्त महाराष्ट्रातच झाले असे मात्र नाही. तर देशात सुद्धा पंवारांनी अशा विविध समुहांचे राजकारण करतात. असे असले तरीही देशाच्या राजकारणात त्यांचा असलेला राजकीय अनुभव व सर्व क्षेत्रातील त्यांना असलेली जाण ही त्यांच्या जमेची बाजू आहे.

महाराष्ट्रात १९९९ साली स्वतंत्र राजकीय पक्षाची स्थापनाकेली. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या स्थापनेनंतरमहाराष्ट्राच्याराजकारणात एका प्रभावी राजकीय पक्षाचा उदय झाला. १९९९ पासून पक्षाने राज्याच्या राजकारणात आपले स्थान निर्माण केले. म्हणजे पक्षाच्या स्थापनेपासून ते २०१४ पर्यंत हा पक्ष सत्ताधारी पक्ष होता. मात्र२०१४ साली पक्षाला आपला प्रभाव टिकवून ठेवता आला नसल्याने पक्षाच्या जागा कमी झाल्या. त्यामुळे शरद पवारांचेराज्यावरचे नियंत्रण कमी झाले की, काय अशी चर्चा सुरु झाली.२०१४ साली विधानसभेप्रमाणेच लोकसभेत देखील पक्षाला फक्त ६ जागाजिंकता आल्या. त्यामुळे पवारांच्या नेतृत्वावरच प्रश्नचिन्ह उपस्थित झाले.

स्थितीदर्शक परिस्थिती जरी पवार यांच्या विरोधी दिसत असली तरी ज्या पंतप्रधानपदाच्या उमेदवारांनी २०१४ च्या निवडणुकीत शरद पवार यांच्यावर सडकून टिका केली. त्याच नेत्याने देशाच्या पंतप्रधा पदावर आरुढ झाल्यावर शरद पवार हे माझे गुरु आहेत त्यांचे बोटधरुन मी राजकारणात आलोय व मी वेळोवेळी पवारांचा सल्ला राजकीय पातळीवर घेत असतो हे म्हणणे पवारांचे देशाच्या राजकारणातील स्थान संख्याबळाच्या पलीकडे गेले असल्याचे दर्शविते.

**शरद पवार आणि राजकारण** : १२ डिसेंबर १९४० साली बारामती तहसीलच्या काटेवाडी गावात जन्माला आलेल्या शरद पवार यांना राजकीय वारसा त्यांच्या घरातूनच लाभल्याचे दिसते. त्यांच्या पुर्वी त्यांच्या आई ह्या राजकीय क्षेत्रात सक्रिय असल्याने पवारांना हा राजकीय वारसा त्यांच्या आईकडून मिळाला आहे. त्यानंतर पवारांनी आपल्या कर्तृत्वावर महाविद्यालयीन जीवनापासून ते देशाच्या कृषीमंत्र्यापर्यंतची सर्व पदे मिळवली व तेवढ्याच जबाबदारीने ते पार पाडली त्यामुळे पवारांचे राजकारण हे समाजहिताची भूमिका घेणारे आहे. मुळात पवारांनी कायम फुले, शाहू व आंबेडकरांच्या विचाराचा वारसा पुढे नेत राजकारण केले. त्यांच्या या व्यापक पुरोगामी भूमिकेमुळे त्यांचीओळख एका पक्षापुरती मर्यादीत राहत नाही. हाचपवाराच्याविचाराचा वारसा अजितदादा पवार व सुप्रिया सुळे पुढे घेऊन जाताना दिसतात.त्यामुळे पवार कुटूंबीयांचे राजकारण हे कायम लोकहिताच्या दृष्टीने झाले आहे.

सध्याच्याकाळात नव्याने राजकारणात येऊ इच्छीणाऱ्या तरुण पिढीने राजकारणाकडे करिअर म्हणून पहावयास सुरुवात केल्याचे दिसते. ह्या पार्श्वभूमीवर राजकीय विश्लेषकांच्या मते, शरद पवार हे पुर्णवेळ करीअर पॉलिटीशिअन आहे. असे म्हणले जाते यावरुन शरद पवार राजकारणाकडे किती क्रियाशीलतेने बघतात याचा बोध होतो.

यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय उत्तराधिकारी अशी ओळख शरद पवार यांनी निर्माण केल्याचे दिसते. आपला राजकीय प्रभाव दाखवून देण्याची संधी शरद पवार कोठेही सोडत असल्याचे दिसत नाही. त्यांचे राजकारण प्रादेशिकतेच्या चौकटीत काहीसे अडकल्याचे दिसते कारण महाराष्ट्राच्या राजकारणात त्यांनी घेतलेली प्रादेशिकतावादाची भूमिका राष्ट्रीय पातळीवरील राजकारणासाठी विरोधीभासी ठरते. असे असले तरी शरद पवारांचे असलेले गटा-तटाचे राजकारण त्यात त्यांची राजकीय मुत्सुददेगीरी देशाच्या पातळीवरील महत्वाच्या पदांवर त्यांचा प्रभाव निर्माण करताना दिसते.

पवार यांची राजकारणातील प्रबळता ही निवडणुकींच्या पलीकडे असल्याचे दिसते. १९६७ साली निवडणुकीच्या राजकारणाद्वारे विधानसभेत पाऊल ठेवताना त्यांची असलेली राजकीय परिस्थिती व पुढे १४ वेळा सलग निवडून येताना राजकीय विरोधकांनी त्यांना नामोहरम करण्याकरीता मोर्चेबांधणी व त्यातून ते कसे निवडून यायचे, मतदारसंघातील मतदारांशी असलेले त्यांचे वैयत्तीक संबंध लोकांना लक्षात ठेवण्याची त्यांची कला यातून त्यांचा राजकारणात असलेला प्रभाव लक्षात येतो.

**शरद पवार आणि पवार कुटूंब** :शरदपवार यांना महाराष्ट्रात दिग्गज मराठा नेतृत्व म्हणून देखील ओळखले जाते. संख्येने मोठ्याप्रमाणात असलेल्या बहूल समाजातून असल्याने संख्येच्या राजकारणात पवार धनस्थानी असल्याचे दिसते. याचबरोबर राज्यातील राजकारणावर व अर्थकारणावर याचबरोबर राज्यातील राजकारणावर व अर्थकारणावर याचबरोबर राजकीय उत्तराधिकारी निर्माण करण्याच्या दृष्टीकोनातून शरद पवार यांनी त्यांचे पुतने, बंधू, मुलगी यांना राजकारणात सक्रिय केल्याचे दिसते. त्यांचे बिल्डर लॉबी, औद्योगिक संबंध यामुळे टू.जी घोटाळा, स्टॅम्प पेपर घोटाळा, कृष्णा खोरे घोटाळा, आय.पी.एल. विवाद ह्या सर्वांमध्ये शरद पवार यांचे नाव आल्याचे दिसते. याचबरोबर गुन्हेगारी जगताशीही त्यांचे संबंध असल्याचे आरोप त्यांच्यावर वारंवार झाल्याचे दिसते.

**शरद पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी :** कुठल्याही परिस्थीमध्ये डगमगून न जाता त्याला संयमाने सामोरे जाण्याची कला शरद पवार यांना अवगत आहे. पंतप्रधानपदाने हूलकावणी दिल्यानंतर शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची स्थापना केली. दररोज १२ ते १५ तास सलग काम करणारे शरद पवार कार्यकर्त्यांमध्ये वैयक्तीक पातळीवर संपर्क प्रस्थापित करण्यात यशस्वी असल्याचे दिसून येते.

प्रकाश पवारांसारख्या राजकीय विश्लेषकांच्या मते, शरद पवार हे दोन प्रकारे राजकारण करतात. एक म्हणजे सामाजिक सुधारणांच्या पातळीवर वेगवेगळ्या निर्णयाद्वारे राजकीय मतसंख्या निर्माण करणे. दुसऱ्या पातळीवर राजकीय टोळधाड राबविणे की, ज्याद्वारे दुसऱ्या राजकीय पक्षातील प्रभावी लोकांना आपल्या छत्रछायेखाली आणून सत्तेची समीकरणे जूळवण्यात शरद पवार अग्रेसर असल्याचे दिसते.

**शरद पवार व २०१४ च्या निवडणुका :** शरद पवार राष्ट्रवादाच्या मुद्दयावर काँग्रेसपासून बाजूला निघाले व स्वतःचा सवतासुभा उभारण्याचे कार्य केले. परंतु नेहरु, चव्हाण विचारसरणीच्या अंगीकराने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ही काँगेस पार्टीच्या सहयोगी राहिलेली दिसते.

भाजप अध्यक्ष अमित शहा यांच्याशी केलेली पवारांनी तडजोडव त्यामुळे २०१४ च्या निवडणुकीत त्यांनी घेतलेली स्वतंत्र लढण्याची भूमिका यामुळे शरद पवार व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी यांची महाराष्ट्रातील राजकारणाची पकड सैल झाल्याची दिसते. त्यामुळे पवार व पवारांच्या पार्टीला मोठ्या नामुष्कीला सामोरे जावे लागत असल्याचे दिसते.

**२०१९ च्या सार्वत्रीक निवडणुका :** २०१९ च्या सार्वत्रीक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात विशिष्टप्प्यावर वेगवेगळी आंदोलने पहावयास मिळत आहे. ह्या आंदोलनामागे अप्रत्यक्षपणे शरद पवार यांचा हात असल्याचे वेगवेगळ्या बातम्यांच्या आधारे म्हणता येते. शरद पवारांच्या या धोरणामुळे महाराष्ट्रातील राज्यशासनाला कामकाज करणे तितकेसे सोपे दिसत नाही. त्यामुळे २०१४ च्या निवडणुकांमध्ये दिलेली आश्वासने व राज्यस्थिती यात विरोधाभास असल्याचे दाखवून देण्यात शरद पवार व त्यांचा पक्ष यशस्वी होताना दिसत आहे.

**निष्कर्ष :**

१. निवडणुकीच्या राजकारणात संख्याबळ हे महत्वाचे असते. तसे संख्याबख हे शरद पवार यांच्यापासून नेहमीच दुर राहिल्याचे दिसते. असे असले तरी वेळोवेळी घेतलेली विशिष्ट भूमिका व पवारांचा प्रभाव देशाच्या व राज्याच्या राजकारणात कायम असल्याचे दिसते.
२. निवडणुकीचा विचार करता शरद पवार ज्या मतदारसंघातून निवडणुका लढवितात तेथील मतदार राजकीयदृष्ट्या जागृत असून अनेक विरोधकांनी त्यांच्य विरोधात प्रचार केल्याचे दिसते. तरी पवार प्रचार न करता निवडून येतात. कार्यकर्ते व जनसमुदाय यांच्याशी शरद पवार यांचा असलेला वैयत्तीक सलोखा व पवार यांचे नाव सत्ताधारी व्यवस्थेत विरोधात असताना प्रकाशझोतात राहणे ही त्यांची अनुभव संपन्नता स्पष्ट होते.
३. शरद पवार यांच्या भोवती मोठ्याा प्रमाणात भ्रष्टाचाराचे आरोप असल्याचे दिसून येते.
४. शरद पवार हे मुत्सुदी नेतृत्व असून विरोधी बाकावर असताना योग्य पद्धतीने जनभाव आपल्याकडे वळवण्यासाठी सावध पद्धतीने भूमिका घेण्याची पवारांची शैली त्यांची राजकारणातील सत्ताकारणांची वाटचाल सुरु असल्याचे दर्शविते.

**संदर्भग्रंथ :**

१. पवार शरद, २०१४, लोक माझे सांगाती, राजहंस प्रकाशन, पुणे.
२. पवारशरद, २०१२, स्पर्धा काळाशी, रोहन प्रकाशॅन, पुणे.
३. पवारशरद व हेमंत टकले, २०१०, काटेवाटी ते नवी दिल्ली, अविस्कार प्रकाशन, पुणे.
४. Kandge Ram, 2015, Pawar Sharad: A Mass Leader, Rajashree Publication,

**Website:**

In1dianexpress.com/ Article/ opinion/ colamns /shorad-pawar-birthday-prakash-singh-badal/

economictimes.indiatimes.com /news /politics/and nation/sharad-pawar-why-is-2014prospects-rest-on-capital-he-has-bailt-as-agriculture-inister/articleshow